1

# भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंतर्गत कलम क्र.१९ अन्वये घोषणा

---

एस. आर. क्र. ०९/२००६ भूसंपादन मौजे — पाडळदे बु. व अलखेड ता. शहादा जि. नंदुरबार येथील ल. पा. यो. सुसरी प्रकल्प वितरीका क्र . ४

---

ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी, शहादा भाग शहादा यांनी खालील परिशिष्ट-१ मध्ये नमुद केलेल्या जमिनी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ कलम-११ अन्वये मौजे- पाडळदे बु. व अलखेड ता. शहादा जि. नंदुरबार ल. पा. यो. सुसरी प्रकल्प वितरीका क्र. ४ या कामासाठी या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक असल्याची किंवा आवश्यक असण्याची शक्यता असल्या बाबतची प्राथमिक अधिसुचना दिनांक २० ऑगस्ट २०२० रोजी प्रसिध्द केली आहे. आणि

ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी, शहादा भाग शहादा यांनी प्रसिध्द केलेल्या सदर प्राथमिक अधिसुचनेवर आजतागायत एकही हरकत प्राप्त झालेली नाही. आणि

उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे या बाबत समुचित शासन तथा जिल्हाधिकारी, नंदुरबार यांची अशी खात्री झाली आहे. त्यामुळे उक्त अधिनियमाच्या कलम-१९ पोटकलम (१) च्या तरतुदींन्वये सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशीलावार वर्णन केलेले क्षेत्र हे कुटूबिंयाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसन क्षेत्र म्हणुन निर्धारीत केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (ग) अन्वये समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी शहादा भाग शहादा यांना पदनिर्देशीत करीत आहे.

सदर प्रस्तावसंबंधी या कार्यालयात उपलब्ध असलेले अभिलेख कार्यालयीन वेळेत उपविभागीय अधिकारी शहादा भाग शहादा यांच्या कार्यालयात पाहणीसाठी उपलब्ध राहतील.

Manisha

मनीषा खत्री *(भा.प्र.से.)*
जिल्हाधिकारी नंदुरबार

स्थळ — नंदुरबार
दिनांक- १९/०७/२०२१

## परिशिष्ट — एक

### मौजे पाडळदे बु व अलखेड ता. शहादा जि. नंदुरबार

| अ.क्र. | गट नंबर | संपादीत करावयाचे क्षेत्र (हे. आर.) |
|---|---|---|
| मौजे पाडळदे बु. ता. शहादा जि. नंदुरबार येथील लघु पाटबंधारे योजना, सुसरी, तालुका शहादा प्रकल्पाच्या वितरीका क्रमांक ४ साठी आवश्यक खाजगी जमिनी | | |
| १ | ११ | ०.०४ |
| २ | १२/२/१ | ०.११ |
| ३ | १६/२-ब | ०.१५ |
| ४ | १६/२-अ | ०.१४ |
| ५ | १६/१/-क | ०.०२ |
| ६ | ३२ | ०.०६ |
| ७ | ३१ | ०.०२ |
| ८ | ३५९ | ०.०१ |
| ९ | ३३ | ०.०२ |
| १० | ३० | ०.१० |
| ११ | २८ | ०.०२ |
| १२ | २९ | ०.०३ |
| १३ | ६८/२-अ | ०.०७ |
| १४ | ६६/१ | ०.१२ |
| १५ | ६७ | ०.१६ |
| १६ | ६९ | ०.०८ |
| १७ | ७०/२-अ | ०.२९ |
| १८ | ७०/२-ब | ०.०४ |
| १९ | ७२ | ०.१५ |
| २० | ७३ | ०.०६ |
| २१ | ७४ | ०.१० |
| २२ | ३५५ | ०.०५ |
| | एकुण क्षेत्र | १.८४ |
| मौजे अलखेड ता. शहादा जि. नंदुरबार येथील लघु पाटबंधारे योजना, सुसरी, तालुका शहादा प्रकल्पाच्या वितरीका क्रमांक ४ साठी आवश्यक खाजगी जमिनी | | |
| २३ | ४५/२-अ | ०.५३ |
| २४ | ३/२/२ | ०.१२ |
| | एकुण क्षेत्र | ०.६५ |
| | पाडळदे बु. व अलखेड एकुण एकंदर क्षेत्र | २.४९ |

## परिशिष्ट – दोन

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव :** लघु पाटबंधारे योजना, सुसरी, तालुका शहादा प्रकल्पाच्या वितरीका क्रमांक ४ साठी आवश्यक खाजगी जमीन, मौजे पाडळदे बु. व अलखेड ता. शहादा जि. नंदुरबार

**प्रकल्पाचे वर्णन :** मौजे पाडळदे बु. व अलखेड ता. शहादा जि. नंदुरबार येथील जमिनीचे भूसंपादन करणे

**समाजाला मिळणारे लाभ :** शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी उपलब्ध होऊन लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होणे अपेक्षित आहे.

## परिशिष्ट – तीन

विस्थापन नाही

## परिशिष्ट – चार

महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण क्रमांक ३८, दिनांक १३ मार्च २०१५ अन्वये सिंचन प्रकल्पाच्या सामाजिक प्रभाव निर्धारणापासुन सुट दिली असल्यामुळे सामाजिक प्रभाव निर्धारण करण्यात आलेले नाही. त्यामुळे त्याचा सारांश प्रकाशित करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

## परिशिष्ट – पाच

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल** – लागू नाही

मनीषा खत्री *(भा.प्र.से.)*
जिल्हाधिकारी नंदुरबार

स्थळ – नंदुरबार
दिनांक- १८/०७/२०२१